रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २०
www.ramprahar.com
बुधवार ६ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

तोतया पोलिसांपासून सावध रहा; पोलिसांचे आवाहन/२
श्रीवर्धन पोलिसांनी केला ९१ हजारांचा गुटखा जप्त/४
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम/७
(अधिक छायाचित्रे पान ३, ६, ८ वर..)

## महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण जाहीर



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ५) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या वेळी महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ जाहीर करण्यात आले. या धोरणामुळे राज्यात येत्या पाच वर्षात १.२५ लाख उद्योजक घडतील आणि ५० हजार स्टार्टअप्स् सुरू होतील असे नियोजन आहे. बैठकीत वाढवण बंदर ते समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर व सुधारित धोरणास मंजुरी दिली गेली. कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांच्या अनुदानात वाढ करून हे अनुदान दोन हजारांवरुन सहा हजार रुपये करण्यास मान्यता देण्यात आली.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर

■ राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांची माहिती



**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी (दि. ५) महत्त्वाची माहिती दिली. या निवडणुका कधी लागेल हे आज सांगता येत नसले, तरी दिवाळीनंतर निवडणुका होण्याची शक्यता आहे, असे वाघमारे यांनी म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत सोमवारी निकाल जाहीर झाल्यानंतर मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नाशिक विभागातील आगामी निवडणुकांबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली.

निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम आखण्यात येणार आहे. सर्व निवडणुका एकत्र घेतल्यास मनुष्यबळाची मोठी अडचण येईल. त्यामुळे निवडणुका टप्प्याटप्प्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, मात्र प्रथम कोणत्या संस्थेची निवडणूक होणार हे अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाबाबत माहिती देताना वाघमारे यांनी सांगितले की, एससी-एसटी आरक्षण निश्चित असते, परंतु ओबीसी आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार लॉटरी पद्धत अवलंबली जाणार आहे. त्यांनी स्पष्ट केले की, मागील निवडणुकांमध्येही ओबीसी आरक्षण होते आणि यावेळीही तेच तत्त्व पाळले जाणार आहे.

राज्यात नव्या रचनेला विरोध करत काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया थांबवावी लागली होती, पण न्यायालयाने या सर्व याचिका फेटाळल्याने लवकरच निवडणुका जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

### 'व्हीव्हीपॅट'चा वापर होणार नाही

प्रारूप प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर मतदार याद्या विभाजित केल्या जातील. १ जुलैपर्यंत मतदार यादीत जे नाव असेल ते गृहीत धरून मतदार निश्चित होतील. या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट यंत्रे वापरण्यात येणार नाहीत, असे निवडणूक आयुक्तांनी या वेळी सांगितले. निवडणुकीसाठी आवश्यक असणारे अधिकारी, कर्मचारी व तांत्रिक यंत्रणा यांचा आढावादेखील बैठकीत घेण्यात आला.





# आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती, प्रदेशाध्यक्षांसह राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजहिताची भूमिका समर्थपणे निभावणारे आणि कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत मंगळवारी (दि. ५) विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या विशेष दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर पनवेलमधील मार्केट यार्ड येथे शुभेच्छा स्वीकारल्या. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली होती.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह इतर मंत्री, खासदार, आमदार, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, कला, क्रीडा, प्रशासकीय, विधी, पत्रकारिता, वैद्यकीय, संगीत, नाट्य, सामाजिक संस्था, संघटना, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले.

या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले होते. यात आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहिमा, शैक्षणिक मदत वाटप, महिला सक्षमीकरण कार्यक्रम आदींचा समावेश होता. या उपक्रमांद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेप्रती असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल व सीकेटी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महारोजगार मेळावा २०२५, भाजप खिडूकपाडा, कामगार नेते प्रभूदास भोईर व सुरेश भोईर यांच्या वतीने रुग्णसेवेसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा लोकार्पण, जाणीव एक सामाजिक संस्था आणि सखी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार चषक भव्य बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा, भाजप प्रभाग १९ आणि जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने मोफत आरोग्य व रक्तदान शिबिर, भाजप रायगड जिल्हा सांस्कृतिक सेलच्या वतीने गदिमा आणि बाबूजींच्या अजरामर कार्याला मानवंदना असलेला ज्योतीने तेजाची आरती हा संगीतमय कार्यक्रम, जागृती फाऊंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर, (पान २ वर..)

### सामाजिक योगदानाचा उत्सव

राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेतून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून एक सामाजिक उत्सव घडवून आणला. भव्य जाहिराती, होर्डिंग-बॅनर यावर खर्च करण्याऐवजी त्यांनी कार्यकर्त्यांना सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत ठिकठिकाणी आरोग्य शिबिर, रोजगार मेळावे, खेळ स्पर्धा, तसेच शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यामुळे वाढदिवस साजरा होण्याच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन हा दिवस एक सामाजिक योगदानाचा उत्सव ठरला. जनतेच्या प्रश्नांशी जोडलेपण, समाजोपयोगी दृष्टिकोन आणि विधायक उपक्रमांची निवड हे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाचे खास वैशिष्ट्य ठरते. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या वाढदिवसाने जनतेच्या मनात अधिक विश्वास निर्माण केला आहे.

## निवडक

### माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन



**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे मंगळवारी (दि. ५) निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांनी जम्मू-काश्मीर, बिहार, गोवा, मेघालयसारख्या राज्यांचे राज्यपाल म्हणून काम केले होते. मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर दिल्लीतील नवी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

### मुंबई विमानतळावरून गांजा, सोने जप्त; दोघे अटकेत

**मुंबई :** सीमाशुल्क विभागाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन दिवस केलेल्या वेगवेगळ्या कारवाईत सहा कोटी ४१ लाख रुपयांचे अमली पदार्थ व सोने जप्त केले. ३ व ४ ऑगस्ट रोजी केलेल्या दोन कारवायांमध्ये दोन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग असल्याचा संशय आहे. याबाबत सीमाशुल्क विभाग अधिक तपास करीत आहे.



# उत्तराखंडमध्ये ढगफुटी

## चौघांचा मृत्यू, ५० जण बेपत्ता

**उत्तरकाशी : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात मंगळवारी (दि. ५) ढगफुटीमुळे भूस्खलन होऊन किमान चार जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे ५० लोक बेपत्ता आहेत. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

गंगोत्री धामचा मुख्य थांबा असलेल्या धराली येथील खीर गड नदीत ढगफुटी झाली. त्यामुळे डोंगराचा मोठा भाग पाण्यासह खाली आणि गावात घुसला. अचानक घडलेल्या या घटनेत नदीकाठी असलेली काही हॉटेल्स, दुकाने आणि घरे वाहून गेल्याची प्राथमिक आहे. सध्या घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी धराली भागातील ढगफुटीच्या घटनेबाबत संवेदना व्यक्त केल्या तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी चर्चा करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला.

# महादेवी हत्तीणीला 'वनतारा'मधून परत आणण्यासाठी राज्य शासनाचा पुढाकार

## पुनर्विचार याचिका दाखल करणार -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ५) नांदणी मठ (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) येथील महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंत्रालयात बैठक झाली.

या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या ३४ वर्षांपासून महादेवी हत्तीण नांदणी मठात राहिली आहे. महादेवी हत्तीण वनतारा रेस्क्यू सेंटरमधून पुन्हा मठात यावी ही जनभावना आहे. जनभावना लक्षात घेऊन राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य सरकारचा पक्षकार म्हणून समावेश करावा तसेच वन विभागाच्या वतीने याबाबत सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल. यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रमाणे व उच्च स्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल.

महादेवी हत्तीणीची योग्य निगा राखण्यासाठी राज्य सरकार डॉक्टरांच्या उपलब्धतेसह एक पथक तयार करून आवश्यक ती सर्व मदत करेल. आवश्यकता वाटल्यास रेस्क्यू सेंटरसारखी व्यवस्थाही करण्यात येईल व त्याप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या सुविधा तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्वतंत्र समिती नेमावी, अशी विनंतीही राज्य शासनामार्फत याचिकेमध्ये करण्यात येईल तसेच या प्रकरणात नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, गणेश नाईक, गिरीश महाजन, प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी, स्थानिक लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# 'ज्योतीने तेजाची आरती'ला पनवेलकरांची दाद








### गदिमा आणि बाबूजींना सांगीतिक मानवंदना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी ग.दि. माडगुळकर आणि ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके उर्फ बाबूजी यांच्या अजरामर कार्याला मानवंदना देणाऱ्या ज्योतीने तेजाची आरती या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी पनवेल येथे (दि. ४) करण्यात आले होते. भाजप रायगड जिल्हा सांस्कृतिक सेलच्या वतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भरभरून प्रतिसाद दिला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत गायनाचा आस्वाद घेतला, तर नागरिकांच्या मिळणाऱ्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे आम्हाला अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याची प्रेरणा आणि ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले.

निर्माता विवेक भागवत असलेल्या या बहारदार कार्यक्रमात गायक मंदार आपटे, धनश्री देशपांडे, नचिकेत देसाई, प्रीती निमकर यांनी भावगीते, भक्तिगीते आणि चित्रपट गीतांचा सुंदर मिलाफ सादर केला. अनघा मोडक यांनी ओघवत्या शैलीत निवेदन केले. सर्व कलाकारांनी त्यांच्या सादरीकरणातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. (पान २ वर.)

# एसटी महामंडळाचे लवकरच यात्री ॲप

**मुंबई : प्रतिनिधी**

चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री ॲप लवकरच एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ते मंत्रालयातील दालनामध्ये ॲप बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील चर्चेवेळी बोलत होते.

या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

मंत्री प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमवून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खासगी कंपन्यांच्या जोखंडातून मुक्त करण्याच्या प्रमाणित हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा, टॅक्सी व ई-बस या वाहनसेवेकरिता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. हे ॲप राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल.



या ॲपला जय महाराष्ट्र, महा-राईड, महा-यात्री, महा-गो छावा राईड यापैकी एखादे नाव देण्या बाबत चर्चा झाली. नवीन शासकीय ॲपला छावा राईड ॲप हे नाव द्यावे असे सर्वानुमते ठरले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने ॲप लवकरच कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# तोतया पोलिसांपासून सावध रहा

## पनवेल शहर पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून रस्त्याने जाणाऱ्या महिला पुरुषांना लुटणाऱ्यांविरोधात सावध रहा, सतर्क रहा, असे आवाहन पनवेल शहर पोलिसांनी पनवेलकरांना केले आहे.

पुढे खुन झाला आहे, चेकींग सुरू आहे. पुढे पोलीस नाकाबंदी चालू आहे, दागिने काढून ठेवा, आम्ही चोर पकडला आहे. त्याने चोरी केलेले दागिने तुम्ही



परिधान केलेल्या दागिन्यांसारखे आहेत. असे सांगून त्या व्यक्तीकडील दागिने, मौल्यवान वस्तू हातचलाखीने चोरी करणे असे चोरांचे उद्दीष्ट असून खरे पोलीस असे करण्यास कधीही सांगत नाहीत. तसेच असे करणाऱ्यांचा कोणी प्रयत्न केल्यास घाबरुन न जाता ११२ या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून नागरिकांना करण्यात येत आहे.

या संदर्भात सोशल मिडीया तसेच महत्वाच्या ठिकाणी बॅनर्स, पॅम्पलेट वाटप करून पोलीस जनजागृती अभियान राबवित आहेत.



**पनवेल : भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विनोद शहा, हिमांशू कोठारी, संजय म्हात्रे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.**



**पनवेल : एएसएम एंटरप्रायजेसचे अभिजित जाधव व सत्यवान नाईक यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला.**

# उरणमध्ये वृक्षारोपण : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**उरण : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि.५) उरण नगर परिषद परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला.

या वेळी उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनिल पाटील, माजी नगरसेवक जान्हवी पंडित, भाजप चाणजे विभागीय अध्यक्ष जितेंद्र घरत, भाजप उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण नगरपालिका कर्मचारीवर्ग व भाजप कार्यकर्ते तसेच महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# हातमाग कापड प्रदर्शनाला प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील हातमाग कापड प्रदर्शन व विक्रीला ग्राहकांच्या आग्रहास्तव १७ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आले आहे. यावेळेस विविध प्रकारचे कपडे उपलब्ध असणार असून त्याच्या लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

भाऊराया हॅण्डलूम सोलापूर यांचे हातमाग कापड प्रसिद्धी व विक्री कार्यक्रमांतर्गत हातमाग कापड प्रदर्शन व विक्री चे आयोजन केले आहे. कॉंग्रेस भवन नित्यानंद मार्ग महात्मा गांधी उद्यान महानगर पालिका जवळ गोखले हॉल शेजारी जुना पनवेल. या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याचे प्रदर्शन प्रमुख पांडुरंग पोतन यांनी सांगितले ते म्हणाले की, यांत्रिक युगा मध्ये स्पर्धा करीत सर्व समस्यांशी सामना करून त्याचे पीढी जात पारंपारिक हातमागावर समृद्धीचे वस्त्र विणण्याचे आणि वस्त्र संस्कृतीच्या अमुल्य ठेवा जोपासण्याचे काम करीत आहोत त्याच्या या गतिशील प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे व त्याची तयार केलेल्या हातमाग कापडाला योग्य बाजार पेठ मिळावी त्या करिता प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आली आहे.

# 'कोमसाप' पनवेलची नूतन कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) पनवेल शाखेची नवीन कार्यकारिणी २०२५ ते २०२८ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी नुकतीच जाहीर करण्यात आली. त्यात अध्यक्षपदी सुभाष कुडके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सचिवपदी विजय गायकर, सहसचिव राजकुमार ताकमोघे, खजिनदार म्हणून काशिनाथ जाधव, जिल्हा प्रतिनिधी– श्री. विशाल पवार व युवाशक्ती प्रमुख म्हणून श्रद्धा तारे यांची निवड झाली. त्याचबरोबर कार्यकारणी सदस्यपदी नागनाथ डोलारे, जयश्री शेट्ये, शिवाजी मोटे, आप्पासाहेब पवार, रंजना करकरे, मीनल वसमतकर, भुजिंगराव हिरवे आणि सल्लागार म्हणून सुनिता जोशी, ए.के. शेख रोहिदास पोटे, उत्तम तरकसे यांची निवड करण्यात आली. कार्यकारणीची बिनविरोध निवड झाल्याबद्दल कोमसातर्फे अभिनंदन करण्यात आले.



# गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्लेक्सला क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी विभागांतर्ग राबविल्या जाणाऱ्या अनिवासी गुरुकुल प्रकल्पाच्या उपक्रमान्वये गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता पाचवी व सहावी या वर्गांची क्षेत्रभेट उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्स या ठिकाणी आयोजित करण्यात आली.



गुरुकुल विभागाच्या क्षेत्रभेटीचे तीन टप्प्यात नियोजन करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांची नुकतीच जिओ इन्स्टिट्यूट ला क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती तर दुसऱ्या टप्प्यात उलव्याच्या रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ला ५वी व६ वी च्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आल्याचे सांगून तिसऱ्या टप्प्यात इ.७वी व ८वी या वर्गातील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट ही दास्तान फाटा येथे आयोजित केली जाणार असल्याचे विद्यालयाच्या गुरुकुल विभागाचे प्रमुख संदीप भोईर यांनी सांगितले.

या वेळी गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, सहावीच्या वर्ग शिक्षिका माधुरी म्हात्रे, पाचवी व चे वर्गशिक्षक विशांत ठाकूर उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी टेबल टेनिस,कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन या खेळांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला तसेच जिम मध्ये विद्यार्थ्यांनी सायकलिंग केली.तसेच स्विमिंग पूल ची पाहणी केली. यावेळी मॅनेजर श्यामनाथ मुंडे यांनी कॉम्प्लेक्सचे महत्व विशद केले तेथील कर्मचारी मनोज म्हात्रे यांनी पाहणीदरम्यान मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

पाचवीच्या व सहावीच्या मुला–मुलींनी प्रत्यक्ष टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन या खेळांचा मनमुराद आनंद लुटला. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी विविध खेळांविषयी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही क्षेत्र भेट यशस्वीपणे आणि आनंदमयी वातावरणामध्ये झाली. शाळेच्या वतीने गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर यांनी आभार मानले.




**पनवेल :** भारतीय जनता पक्षाचे युवा नेते परेश घरत यांचा वाढदिवस मंगळवारी सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन परेश घरत यांनी राबवलेल्या सामजिक उपक्रमाचे कौतुक करुन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक मनोज भुजबळ, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, जितेंद्र वाघमारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

खारघरचा राजा मंडळाच्या वतीने महाराणी पैठणीची कार्यक्रम तसेच महिलांसाठी विविध स्पर्धा आणि साडी वाटप, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रम्ह साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने शास्त्रीय व सुगम संगीत सुश्राव्य मैफिल, शिवतेज मित्र मंडळ व साबाई माता महिला मंडळ खारघरच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर, भाजप कळंबोलीच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्रंथतुला तसेच सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्या वतीने धाकटा खांदा येथील शाळेत चित्रकला स्पर्धा, भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहराच्या वतीने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय महापालिका शाळा क्रमांक १मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, खारघर स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे प्री इंटर स्कूल बास्केटबॉल स्पर्धा, गुड मॉर्निंग ४० प्लस आदई वलप विभाग व भाजप पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने क्रिकेट स्पर्धा, आरपीआयचे पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या वतीने रक्तदान तसेच पॅनकार्ड व आधार कार्ड शिबिर, नवीन पनवेल येथे माजी नगरसेविका वृषाली वाघमारे यांच्या वतीने विविध कामांचे लोकार्पण, आयुष्यमान भारत कार्ड वाटप आणि विद्यार्थ्यांना वह्या वाटप, भारतीय जनता युवा मोर्चा प्रभाग क्रमांक १४च्या वतीने स्वच्छतादूतांना रेनकोट व टिफिन वाटप, रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच शाळेतील विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या आयोजनातून सवलतीच्या दरात वॉटर फिल्टर, विकासकामांचे लोकार्पण, तसेच विविध मंडळांत वृक्षारोपण असे अनेक सामाजिक उपक्रम आयोजित करत वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

**नमस्कार, आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा... एक कार्यकुशल आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून आपण पनवेल विधानसभा मतदारसंघ आणि रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी उत्तम योगदान देत आहात. हे कार्य अशाच उत्तम प्रकारे यापुढेही सुरू रहावे; लोकसेवेचा आपला मार्ग उत्तरोत्तर अधिक प्रशस्त होत जावा आणि त्यासाठी सर्वशक्तिमान परमेश्वराने आपणांस आरोग्यसंपन्न, उत्साहपूर्ण, यशस्वी दीर्घायुष्य प्रदान करावे हीच आजच्या दिनी शुभकामना...**

**–राम शिंदे, सभापती,** महाराष्ट्र विधान परिषद

## 'ज्योतीने तेजाची आरती'ला पनवेलकरांची दाद

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, मिलिंद पाटील, सोपान जांभेकर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, सुनील बहिरा, गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, माधुरी गोसावी, अमोघ ठाकूर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्तम आयोजनामुळे हा कार्यक्रम पनवेलकरांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.



## संपादकीय

# नियोजनातून तोडगा हवा

कबुतरांचे जीव वाचवणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे या तिन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत अशी समतोल भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कबुतरखान्यांविषयीच्या वादावर घेतली आहे. कबुतरांची विष्ठा व पिसांची धूळ यातून फुफ्फुसाचा गंभीर विकार उद्भवतो असे तज्ज्ञ डॉक्टर सांगतात. त्यामुळे या प्रश्नी तोडगा काढायला हवा. परंतु अकस्मात दाणापाणी बंद करून कबुतरांना मारणेही योग्य म्हणता येणार नाही. अभ्यासाअंती यावर नीट नियोजनपूर्वक तोडगा आवश्यक आहे.

**कबुतरांमुळे किंवा त्यांच्या विष्ठेमुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे ध्यानात येऊ लागल्यावर कबुतरखाने हटवण्याची मागणी गेली काही वर्षे जोर धरू लागली. कबुतरांची विष्ठा किंवा पिसे यांच्यातून निर्माण होणारी धूळ ही श्वासामार्फत फुफ्फुसात जात राहिल्यास फुफ्फुसात फायब्रॉसिसची प्रक्रिया सुरू होते असे श्वसनविकार तज्ज्ञ डॉक्टर सांगतात. या विकारात बाधित व्यक्तीमध्ये सुका खोकला, चालल्यावर व जिने चढल्यावर धाप लागणे यांसारखी लक्षणे दिसू लागतात. कबुतरांशी संपर्क आल्यास कोणत्याही वयाच्या व्यक्तीला हा विकार होऊ शकतो. अनेक प्रकरणांमध्ये ही स्थिती बरीच उशीरा ध्यानात आल्याचेही आढळून आले आहे. हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनायटिस हा फायब्रॉसिसचा प्रकार कबुतरांमुळे होतो. लंग फायब्रॉसिसची प्रक्रिया एकदा सुरू झाली की फुफ्फुसे पुन्हा पूर्ववत निरोगी होत नाहीत. रुग्णाला ऑक्सिजनची गरज भासते. कबुतरांपासून दूर राहणे हाच उपाय असतो असे डॉक्टर सांगतात. प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांवरील चर्चेमुळे गेली काही वर्षे यासंदर्भात थोडीफार जागरुकता निर्माण झाली असली तरी सगळ्यांनाच याची माहिती नाही हे ज्या प्रकारे कबुतरखाने बंद करण्याला विशिष्ट समाजाकडून विरोध झाला त्यावरून दिसते. निवासी परिसरात कबुतरांना खाद्य देणे आरोग्याच्या दृष्टीने टाळायला हवे. अलीकडेच विधिमंडळ अधिवेशनातही याविषयी चर्चा झाली होती. मुंबई उच्च न्यायालयातही याविषयी सुनावणी सुरू आहे. परंतु अलीकडेच मुंबई महापालिकेकडून दादरच्या प्रसिद्ध कबुतरखान्यावर कारवाई करण्यात आल्यानंतर पक्षीप्रेमी तसेच जैन समाजाकडून त्यास आक्षेप घेण्यात आला. रविवारी जैन समाजाने या कारवाईविरोधात निदर्शनेही केली. मुंबई महापालिकेने संपूर्ण कबुतरखाना ताडपत्रीने झाकून टाकला होता. ही कारवाई आमच्या धर्माच्या विरोधात आहे अशी भूमिका जैन समाजाने घेतली. कबुतरांना दाणापाणी मिळत नसल्यामुळे ती रस्त्यावर येत आहेत, गाड्यांखाली येत आहेत याचा विचार करायला नको का, असा सवाल या समाजाकडून करण्यात आला. दारू, सिगरेट, गुटखा यामुळेही लोक मरत आहेत. मग त्याविरोधात कारवाई का नाही असा युक्तिवादही या कारवाईच्या विरोधात केला गेला. मुंबईतील काही कबुतरखाने हे 'हेरिटेज साइट' आहेत याकडेही लक्ष वेधले गेले. यासंदर्भात पार पडलेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेने योग्य ती कारवाई करावी असे म्हटले होते. त्यानुसार महापालिकेने दादर येथील कबुतरखाना ताडपत्रीने झाकण्याची कारवाई केली होती. परंतु या कारवाईला विरोध झाल्यानंतर मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संवेदनशीलतेने निर्णय घेत, महापालिकेने कबुतरांना नियंत्रित खाद्यपुरवठा सुरू ठेवावा असे निर्देश दिले. कबुतरखान्यांच्या दुष्परिणामांचा तज्ज्ञांकडून वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास अहवाल तयार करण्याच्या तसेच कबुतरांच्या विष्ठेचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. निवासी वस्त्यांपासून दूर योग्य पद्धतीने व्यवस्थापन केले जाणारे पक्षीगृह उभारण्यासारखे उपाय यासंदर्भात करावे लागतील असे दिसते आहे.**

# श्रीवर्धन पोलिसांनी केला ९१ हजार रुपयांचा गुटखा जप्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी, बातमीदार**



मागील दोन ते तीन महिन्यांपासून श्रीवर्धन शहरामध्ये अवैधरित्या गुटखा विक्री चालू असल्या बाबत बातम्या सातत्याने प्रसिद्ध होत होत्या. अनेक वेळा श्रीवर्धन पोलिसांनी गुटखा विक्रेत्यांकडे याबाबत धाड देखील टाकली. परंतु पोलिसांच्या हाती काहीही लागले नव्हते. त्यानंतर देखील श्रीवर्धन मधील पत्रकारांनी गुटख्याची रिकामी पाकिटे सापडतात मग गुटखा विक्री बंद कशी? अशाप्रकारे बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. दरम्यान श्रीवर्धनचे तत्कालीन पोलिस निरीक्षक यांची श्रीवर्धन येथून पोलीस मुख्यालय अलिबाग या ठिकाणी बदली झाली.

श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये उमेश पाटील हे नव्याने पोलीस निरीक्षक म्हणून हजर झाले. पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर दहा ते बारा दिवसांच्या कालावधीनंतर श्रीवर्धन पोलिसांनी श्रीवर्धन तालुक्यात व शहरामध्ये गुटखा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यास गुटखा पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कारसह अटक केली आहे. मात्र अटक करण्यात आलेला गुटखा व्यापारी हा मूळ मालक नसून या सर्व छोट्या गुटखा विक्रेत्यांना गुटखा पुरवणारा म्हसळे येथील मोठा गुटखा माफिया अद्यापही रायगड पोलिसांना गुंगारा देत आहे.

४ ऑगस्ट रोजी श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांना श्रीवर्धन शहरातील बुडण पाखडी परिसरामध्ये गुटखा विक्री करण्यासाठी आल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सदर मिळालेल्या माहितीनंतर श्रीवर्धन चे पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन लकडे व पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील त्याचप्रमाणे पोलीस शिपाई (गोपनीय) कृष्णा कदम,पो. हवालदार प्रशांत देशमुख यांनी बुडण पाखडीत पहाणी केली असता, एका घराच्या परसावामध्ये सिल्वर रंगाची कार उभी होती व त्याच्याजवळ एक इसम उभा होता.

सदर इसमाकडे चौकशी केली असता अगोदर त्याने उत्तर देण्यास नकार दिला. परंतु पोलिसी खाक्या दाखवताच टाटा इंडिका विस्टा कार क्रमांक एम. एच. ०२ डी.जे. २७८४ या कारची तपासणी केली असता कारमध्ये विमल कंपनीच्या प्रतिबंधित गुटक्याच्या एकूण सहा बॅग मिळून आल्या. त्याची अंदाजे किंमत ९१५२० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेला गुटखा आणि कार मिळून एकूण २४१५२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी शोएब फारुख पटेल, वय २७ रा. बुडण पाखाडी, श्रीवर्धन याला ताब्यात घेण्यात आले आहे.

या प्रकरणी रायगडच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल,अप्पर पोलिस अधीक्षक अभिजित शिवथरे, श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलिस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# माणगाव तालुका भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्षपदी रचना थोरे




**माणगाव: प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड महिला मोर्चाची आढावा बैठक रविवारी पेण येथील लाड फार्महाऊसवर महिला मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाली. या बैठकीत पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यामध्ये माणगाव तालुका भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्षपदी रचना निलेश थोरे यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यांना तसे नियुक्तीपत्र दक्षिण रायगड महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष डॉ. चित्रा आस्वाद पाटील यांच्या सहीनिशी देण्यात आले.

यावेळी लोकसभा प्रमुख भाजप रायगड सतीश धारप, माजी आमदार पंडित पाटील, महिला मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, माजी दक्षिण रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, गीता पालरेचा, श्रेया कुंटे, प्रीतम पाटील, शर्मिला पाटील, वंदना म्हात्रे, स्मिता पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आले. रचना थोरे यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

रचना थोरे या माणगाव येथील भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या सुविद्य पत्नी असून त्या अलिबाग पंचायत समितीच्या माजी सदस्य आहेत.

# भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा चिटणीसपदी पल्लवी मढवी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील निडी गावातील युवा महिला नेत्या पल्लवी निखिल मढवी यांची भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती केली आहे. पल्लवी मढवी यांना भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड अध्यक्ष डॉ. चित्रा आस्वाद पाटील यांच्या हस्ते पेण येथे झालेल्या कार्यक्रमात नियुक्तीपत्र देण्यात आले.

या वेळी माजी आमदार भाजप नेते पंडित पाटील, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा उपाध्यक्ष वर्षा भोसले व इतर उपस्थित होते. दरम्यान, मढवी यांच्या नियुक्तीनंतर त्यांचे अभिनंदन होत आहे.




# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय कॉमर्स दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

जे.बी. सावंत एज्युकेशन टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय कॉमर्स दिन कार्यक्रम उत्साहात झाला.

या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे कॉमर्स विभाग प्रमुख प्रा.हर्षल जोशी यांनी आंतरराष्ट्रीय कॉमर्स दिनाबद्दलची सविस्तर माहिती



दिली. त्यामध्ये उद्योजक व्यापारी व अनुषंगीक सेवा या भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा असल्याचे त्यांनी सांगितले. दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या सोमवारी हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय कॉमर्स दिन म्हणून साजरा केला जातो या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख, प्रा.अशोक मोरे, डॉ.नितीन मुटकुळे, डॉ.जगदीश शिगवण, ग्रंथपाल अमित बाकाडे, मुख्य लिपिक दिलीप ढेपे, प्रा.भारत पवार, प्रा.सायगावकर उपस्थित होते.

# रोहा कोमसापच्या अध्यक्षपदी संध्या दिवकर

**धाटाव : प्रतिनिधी**



प्रख्यात कवयित्री मुख्यतः आगरी बोलीभाषेतील साहित्यिक, रोहा कोमसापच्या अध्यक्षा संध्या दिवकर यांची कोमसापच्या अध्यक्षपदी सर्वानुमते बिनविरोध पुनर्निवड करण्यात आली आहे,

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रोहा शाखेची नवीन कार्यकारिणी निवड सभा नुकतीच घेण्यात आली. या सभेमध्ये सन २०२२ ते २०२३या आपल्या अध्यक्षीय कालावधीत अविरत साहित्य सेवा करून रोहा शाखेचा नावलौकिक वाढविण्यात अध्यक्षा कवयित्री संध्या दिवकर यशस्वी ठरल्या. त्यामुळे दिवकर यांची पुन्हा अध्यक्षपदी पुढील तीन वर्षांसाठी निवड करण्यात आली. कोकणाची साहित्य परंपरा जोपासत नव्या पिढीला मराठी भाषेकडे आकर्षित करत आपली संस्कृती जपण्याचा विविध उपक्रम राबावत परिषदेच्या शाखा करत आहेत. जल्हा कविसंमेलने , जिल्हा सभा, स्पर्धा, वर्षासहली असे भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले. सर्वांना सोबत घेऊन केलेल्या कार्यामुळे कोमसाप रोहा शाखा नावा रुपाला आली

सन २०२५– २०२८ ची नविन कार्यकारिणी खालील प्रमाणे. अध्यक्षा संध्या दिवकर, उपाध्यक्ष आरती धारप, सचिव विजय दिवकर, उपसचीव भरत चौधरी, खजिनदार अजित पाशिलकर, जिल्हा प्रतिनिधी सुखद राणे, युवाशक्ती प्रमुख शरद कदम, कार्यकारिणी सदस्य निकीता साळवी, नेहल प्रधान, राजेश काफरे, वैशाली साळुंखे, मारुती कदम, राजेंद्र जाधव, सचीन साळुंके, तर सल्लागार म्हणून मकरंद बारटक्के यांची निवड करण्यात आली.

# श्रावणमासात केळीच्या पानांना मागणी

## व्रत व पुजेवेळी वापर; आदिवासींना रोजगाराचे साधन

**तळा : प्रतिनिधी**

आधुनिक युगात अनेक शोध संशोधन लागले आहेत आधुनिकतंत्राने कागदाच्या, थर्माकोलच्या पत्रावळ्यांचा व्यवसाय जरी तेजीत चालत असला तरीही श्रावणमासात केळीच्या पानांना अधिक मागणी होत आहे. त्यामुळे या केळीच्या पानांच्या विक्रीतून अनेक आदिवासी बांधवांना एक व्यवसाय मिळत असून उत्पन्नाचे ते एक महिन्यासाठी साधन ठरत आहे.



श्रावण मासात अनेक विविध व्रत,वैकल्ये, आध्यात्मिक कार्यक्रम , ग्रंथवाचन ,पुजापाठ आदि आध्यात्मिक कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमासाठी केळीच्या पानांची मागणी ही अधिक प्रमाणात असते ही पाने स्वच्छ धूवून भोजन(महाप्रसाद) त्या पानांवर वाढून पारंपारिक पध्दतिने महाप्रसाद ग्रहण करत असतात. तसेच देवासाठी नैवद्यही या पानांवरतीच ठेवत असल्याने सध्या श्रावण मासात या केळीच्या पानांना मागणी वाढते आहे.

जंगलामध्ये अनेक ठिकाणी रानटी केळीची झाडे जुलै, ऑगस्ट मध्ये उगवलेली असतात. ती केळीची पाने कापून आणून मोठ्या प्रमाणात सोमवार, गुरुवार, शनिवार व मंगळवार या दिवशी बाजारात विक्रीसाठी येतात व थोड्या वेळातच त्या केळीच्या पानांची विक्री होते. आदिवासी समाजाला एक व्यवसाय मिळतो . यापुर्वी ही पाने अधिक प्रमाणात आणली जात होती, मात्र आठ,नऊ वर्षाच्या काळावधीत याचे प्रमाण कमी झालेआहे, तरीही या आधुनिकतेतही धार्मिक सण उत्सव हे पारंपारिक पध्दतिने साजरे होतात या परंपरेत विज्ञानाची ही जोड असते. त्यामुळेच या परंपरा आजही टिकून असल्याचे पहावयास मिळत आहे. म्हणूनच केळीच्या पानांनाही श्रावण मासात महत्व असून केळीच्या पानांची मागणी होते

या केळीच्या पानांवर भोजन घेताना एक वेगळा असा आनंद मिळतो.तसेच विज्ञान व आयुर्वेद याचा ही संबंध यांच्याशी येतो त्यामुळे हे आरोग्यास चांगले असते.तसेच काही हॉटेलमधे ही ही पाने वापरली जातात.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खोपोली, रोह्यात उपक्रम



**खालापूर :** आमदार प्रशांत दादा ठाकूर साहेब यांनी देखील आपला वाढदिवस ५ ऑगस्ट रोजी यंदा समाजसेवेतून साजरा करण्याचे आवाहन भाजप कार्यकर्त्यांना केले होते.

प्रशांत दादांच्या आव्हानाला प्रतिसाद देत भाजप खोपोली शहर मंडलाच्या वतीने ५ ऑगस्ट २०२५ रोजी रोजी मोगलवाडी हिंदी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी शालेय वस्तूंचे वाटप , धाकटी पांढरी, विठ्ठल मंदिर साजगाव, येथे वृक्षारोपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय खोपोली येथे रुग्णांना फळ वाटप या कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमा प्रसंगी लोक नेते रामशेठ ठाकुर यांचा सामाजिक व राजकीय वारसा गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून प्रशांत दादा कशा पद्धतीने लोकसेवेतून पुढे चालवित आहेत याची माहिती महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील दिली. आपला वाढदिवस सामाजिक सेवेतून कसा साजरा करायला सांगितले त्याची माहिती भाजप खोपोली शहर मंडळ अध्यक्ष राहुल जाधव यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी विकास नाईक, अजय इंगुळकर, माजी शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, रामभाऊ पवार, निकेत पाटील,कृष्णा पाटील, माजी नगरसेवक अविनाश तावडे, सूर्यकांत देशमुख, इंदरमल खंडेलवाल, विक्रम साबळे, अनिल कर्णूक, सचिन मोरे, किर्ती ओसवाल, प्रमोद वाघ, संतोष नारखेडे, सुभाष सावंत, सुनील नांदे, जितू शाह, राजेश धोत्रे, प्रल्हाद अत्रे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष अश्विनी अत्रे, माजी नगरसेविका अनिता शाह, अपर्णा मोरे, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**धाटाव :** आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त, रोहा तालुक्यातील पीएनपी तळाघर हायस्कूल येथे मंगळवार (दि . ५) रोजी एक प्रेरणादायी आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, विद्यार्थ्यांच्या हस्तेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक कार्याचा संदेश मुलांना दप्तर देऊन शाळेतील इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.या वेळी शाळेच्या परिसरात एक उत्साहाचे व सामाजिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांमधूनच समाजपरिवर्तनाच्या विचारांची पेरणी होणे, हा या कार्यक्रमाचा मूळ उद्देश होता.

या कार्यक्रमात देशाचे माजी सैनिक कदम काका ,रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, ट्रान्सपोर्ट सेलचे अध्यक्ष निलेश धुमाळ, रोठ खुर्द बुथ अध्यक्ष सचिन मोरे, पंचायत राज प्रमुख तुप्ती बामणे, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा रिया कासार, उपस्थित होते.





**धाटाव :** आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त महादेव वाडी येथील राजीप शाळेत एक प्रेरणादायी उपक्रम पार पडला. भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व शाळेला ब्लॅकबोर्ड भेट देऊन मंगळवार दि. (५ ) रोजी वाढदिवस साजरा करण्यात आला . या उपक्रमाचा उद्देश केवळ वाढदिवस साजरा करणे नसून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक कार्याची विद्यार्थ्यांना आणि समाजाला जाणीव करून देणे हा होता.

या वेळी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, ट्रान्सपोर्ट सेलचे अध्यक्ष निलेश धुमाळ, रोठ खुर्द बुथ अध्यक्ष सचिन मोरे, पंचायत राज समिती अध्यक्ष तुप्ती बामणे, रोहा तालुका महिला मोर्चा अध्यक्षा रिया कासार , विकास बामणे, सागर जोगडे, संकेत मोरे, निलेश जंगम, ज्ञानेश्वर भगत, प्रणित भगत, सौरभ जोगडे, भाजप सांस्कृतिक सेल प्रमुख रिया लोखंडे, दिप्ती कासार यांच्यासह भाजपाचे इतर पदाधिकारी, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# सर्दी, खोकल्यासह उलटी, तापाच्या साथ आजारांनी खोपोलीकर हैराण

रुग्णालयात गर्दी



**खालापूर : प्रतिनिधी**

मागील दोन आठवडे वातावरणात होत असलेला बदलांने खोपोली शहरात सर्दी, खोकला व तापाची साथ सूरू झाली असतानाच निसर्गाच्या लहरी वातावरणा मुळे यात अधिक भर पडली असून नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयासह खाजगी रूग्णालयात मोठ्या प्रमाणावर रूग्णाची उपचारासाठी तुडुंब गर्दी केली आहे.

गेल्या दहा, बारा दिवसांपासून पाऊस सक्रिय झाला असला तरी कधी ऊन, वारा,थंडी या लहरी वातावरणामुळे तसेच सध्याच्या वातावरणात सतत होत असलेल्या हवेतील बदलाचे दुष्परिणाम मुळे खोकला, सर्दी, ताप,थंडी, उलटी, जुलाब व घसा दुखणे याला पोषक ठरत आहे. अशा अनियमित वातावरणा मुळे या साथीच्या आजाराने डोकेवर काढल्याने दवाखान्यात सर्वत्र रूग्ण उपचारासाठी गर्दी करताना आढळत आहेत .घरातील एका व्यक्तीला संसर्ग झाल्यास त्याची लागण संपूर्ण कुटुंबाला होत आहे.

खोपोली पालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात ओपीडीत साथीच्या आजाराचे सरसरी दिवसाकाठी १५० च्या आसपास रूग्ण तपासणी करून घेत आसल्यची माहिती रूग्णालयातील डॉक्टरांनी दिली.

शहरातील विविध खाजगी दवाखाने हौसफूल होत असून पालिका आरोग्य यंत्रणेने सतर्क राहणे गरजेचे असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

# आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य आणि फळांचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसा निमित्त कर्जत भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे तर रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.



धाकटे वेणगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप तर श्रद्धा फॉउंडेशन मधील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, रमेश मुंढे, मंडल सचिव अतुल बडगुजर, दिनेश भरकले, शैलेश देशमुख, शहर महिला अध्यक्षा शर्वरी कांबळे, माजी नगरसेविका बिनिता घुमरे, सुषमा ढाकणे आदी उपस्थित होते.

# खालापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत दाखले वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत खालापूर तहसील कार्यक्षेत्रातील खालापूर मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ४ ऑगस्ट रोजी सरनोबत नेताजी पालकर सभागृहात खालापूर येथे खास शिबीर पार पडले.

शिबिरात ऍग्री स्टॅक, आधार कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, संजय गांधी योजना, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, अधिवास दाखला, नविन मतदार नोंदणी व विविध दाखले वाटप करण्यात आल्याने उपस्थित नागरिकांनी महसूल विभागाच्या कामगिरी बाबत समाधान व्यक्त केला. यावेळी तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल नायब तहसीलदार



विकास पवार मंडळ अधिकारी संदेश पानसरे, ग्राम महसूल अधिकारी आशिष राऊत, प्रतीक बापर्डेकर, सचिन किर्दत, किरण लोखंडे, सुवर्णा कोल्हे, शैला गवळी, महसूल सेवक सुरेश ठोंबरे उपस्थित होते तसेच मोठ्या संख्येने खालापूर मंडळातील नागरिक उपस्थित होते.

# उच्च शिक्षण वसतिगृह उभारण्यासाठी आगरी समाज नेते करणार अर्थसहाय्य



**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्याला आगरी भाषेबद्दल अभिमान असावा आपण आपली आगरी संस्कृती जपली पाहिजे कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी समाज संघटना वसतिगृह आणि स्पर्धा परीक्षा साठी अभ्यासिका उभारण्याचा संकल्प केला आहे. या कार्यासाठी आगरी समाजाचे नेते सर्वतोपरी सहकार्य करणार आहेत, असे खासदार संजय पाटील यांनी येथे जाहीर केले.

नेरळ येथील धामोते-कोल्हारे येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहामध्ये आगरी समाजाच्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. खासदार संजय पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे, अखिल आगरी समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शरद म्हात्रे,आगरी कोळी गावठाण क्षेत्र याचिकाकर्ते जयेंद्र खुणे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी उपसभापती अरविंद पाटील, सरपंच महेश विरले, इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे, ह. भ. प. शिवराम महाराज तुपे, संघटनेचे माजी अध्यक्ष सावळाराम जाधव, भरत भगत, संस्थापक सदस्य ए. टी. पाटील, सूर्यकांत चंचे, शरद भगत, संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष भगवान धुळे, शिवाजी कराळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, पालक व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्तनपान जागरूकतेसाठी 'फन-फिल्ड बेबी शॉवर'

**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट हा जागतिक स्तनपान आठवडा म्हणून साजरा केला जातो. याचा उद्देश मातांना स्तनपानाच्या महत्वाविषयी जागृत करणे हा आहे. यानिमित्ताने खारघरच्या मेडिक्व्हर हॉस्पिटलने २० हून अधिक गर्भवती जोडप्यांसाठी एक विशेष बेबी शॉवर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये मनोरंजनाक्मक खेळ, जागरुकता आणि स्तनपानाचे महत्व पटवून देणाऱ्या जनजागृती सत्राचा समावेश होता.

या ठिकाणी मातृत्वाच्या संकल्पनेवर आधारीत फोटो बूथ देखील उपलब्ध करुन देण्यात आले होते. या कार्यक्रमाला डॉ. अनुरंजिता पल्लवी, डॉ. कल्पना गुप्ता, डॉ. हिमानी गुप्ता यांचा विशेष सहभाग होता. मेडिक्व्हर हॉस्पिटलने हा एक अनोखा उपक्रम आखला होता.


**ग्रामपंचायत, पुगांव**
**मु. पो. पुगांव, ता. रोहा, जि. रायगड.**

**जाहीर निविदा सूचना**
**१५ वा वित्त आयोग**
**ग्रामपंचायत पुगांव ता. रोहा, जि. रायगड**

ग्रामपंचायत पुगांव हदीतील १५ व्या आयोग ग्रामपंचायत स्तर निधीतून खालील विकास कामे हाती घेतले आहे सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकात मा. उपभियांता (बांधकाम व पाणीपुरवठा विभाग) ता. रोहा यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून सदर कामे करणेसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मंजूर संस्था यांच्या कडून टक्केवारी दराची लिफाफपद्धतीने सिलबंद निविदा मागवणेत येत आहेत सदर जाहीर निविदा दिनांक ५/०८/२०२५ ते १३/०८/२०२५ सकळी ११:०० ते संध्याकाळी ५:०० वाजे पर्यंत ग्रा पं कार्यलयात समक्ष सादर करणेत याव्यात पोस्टाने आलेल्या निविदांचा विचार करणेत येणार नाहीत सदर निविदा दिनांक १४/०८/२०२५ मा. प्रशासक यांच्या उपस्थितीत दुपारी २:०० नंतर उघडणेत येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | इसारा रक्कम | निविदा फोर्म फी | कामपूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अजित देशमुख यांच्या घरापासून ते नथुराम येलकर यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | ११८९२१/- | नोंदणीकृत | ११८९/ | १००/- | १ महिना |
| २ | ग्रामपंचायत पुगांव येथे दोन कपोस्ट पिट बांधणे | १०००००/- | नोंदणीकृत | १०००/ | १००/- | १ महिना |
| ३ | गजानन देवकर ते अथोक झोलगे यांच्या घरापर्यंत बंधिस्त गटार बांधणे | १२३०००/ | नोंदणीकृत | १२३०/- | १००/- | १ महिना |
| ४ | ग्रामपंचायत पुगांव येथे पाणपोई बांधणे | ६००००/- | नोंदणीकृत | ६००/- | १००/- | १ महिना |
| ५ | रा.जि.प.प्राथमिक शाळा पुगांव येथे शौचालय दुरुस्ती करणे, | ३०३१८/- | नोंदणीकृत | ३०३/- | १००/- | १ महिना |
| ६ | रा.जि.प.प्राथमिक शाळा पुगांव येथे पेवर ब्लॉक बसविणे | ३४३२५/- | नोंदणीकृत | ३४३/- | १००/- | १ महिना |
| ७ | पुगांव येथील नवीन विहिरीला जाळी बसविणे | १०००००/- | नोंदणीकृत | १०००/- | १००/- | १ महिना |

१) निविदा दिनांक ४/०८/२०२५ ते १३/०८/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील व दिनांक १४/०८/२०२५ रोजी मा.प्रशासक यांच्या उपस्थितीत उघडणेत येतील.
२) प्रत्येक निविदा स्वतंत्र असावी व सोबत जीएसटी प्रमाणपत्र पॅनकार्ड सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र एकाच तखोट्यात असावे.
३) ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
४) निविदा फॉर्म फी परत मिळणार नाहीं.
५) काम सुरु करणे पूर्वी कामाच्या जागेचा फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचा फोटो सादर केल्याशिवाय बिल अदा केले जाणार नाही.
६) काम पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने कामाची माहिती दर्शवणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
७) काम मंजूर झाल्यावर ठेकेदाराने रुपये पाचशेच्या स्टॅम्प पेपर वर दोन जमीन उतारासह स्वखचनि करारनामा करू घ्यावा लागेल.
८) ठेकेदाराच्या बिलातून नियमानुसार शासकीय कपाती कपात करून बिल अदा करणेत येईल.
९) कामांची बिले प्रामपंचायत १५ वा वित्त आयोग उपलब्ध निधीनुसार अदा करणेत येईल.
१०) कामपूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यांनी कामाची स्थितीची पाहणी करून सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.
११) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा व नाकारण्याचा व निविदा उघडण्याचा अधिकार प्रशासक ग्रामपंचायत पुगांव यांनी राखून ठेवता आहे. त्याची कोठेही तक्रार करता येणार नाहीं.

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रामपंचयात पुगांव**
**ता. रोहा, जि. रायगड**

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रामपंचयात पुगांव**
**ता. रोहा, जि. रायगड**


# देदीप्यमान नेतृत्वाचा उज्वल प्रवास

प्रशांत रामशेठ ठाकूर हे नाव उच्चारलं की कर्तृत्व, नम्रता आणि जनतेशी असलेलं नातं यांचा संगम डोळ्यासमोर येतो. या नावामागे उभं आहे एक ठाम नेतृत्व, जे आपले वडील लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे विचार, कार्य आणि जनसेवेची परंपरा पुढे नेत आहे. त्यांचा वाढदिवसही समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा झाला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातून 'रामराज्य' म्हणजे काय, हे सिद्ध केलं. पक्ष संघटनेपासून खासदारकीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा सामाजिक बांधिलकीचा आदर्श होता. रायगड जिल्ह्याचा विकास, जनतेशी संवाद आणि समृद्धीचा आराखडा यामागे त्यांची दूरदृष्टी होती. या परंपरेचे वारसदार ठरले त्यांचे सुपुत्र प्रशांत ठाकूर. त्यांनी नगरसेवक, नगराध्यक्ष आणि आता सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून येत आपल्या कर्तृत्वाची ठसठशीत मोहोर उमटवली आहे. त्यांच्या कार्याचा पसारा फक्त राजकारणापुरता मर्यादित नसून तो समाजकारण, शैक्षणिक प्रगती, सामाजिक उपक्रम आणि सर्वांगीण विकास यापर्यंत विस्तारलेला आहे.



पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर या शहराच्या खऱ्या अर्थाने विकासाची गंगा वाहायला लागली ती आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीमुळेच. त्यांच्या अथक प्रयत्नांनी पनवेल हे केवळ नकाशावरील एक ठिकाण न राहता विकासाचं हृदयस्थान बनलं आहे. त्यांचा स्वभावही तितकाच नम्र आणि संवेदनशील. कार्यकर्त्यांच्या अडचणी, जनतेचे प्रश्न हे ते स्वतःचे समजून घेतात. म्हणूनच आज तमाम पनवेलवासीयांच्या हृदयात ते दादा या प्रेमळ नावाने वसले आहेत. त्यांचे बंधू परेश ठाकूर हेसुद्धा पनवेल महापालिकेचे नगरसेवक आणि सभागृह नेते या पदांवर कार्य करत पनवेलच्या विकासात मोलाचा वाटा देत आले आहेत. ठाकूर कुटुंबियांचे हे एकत्रित नेतृत्व म्हणजे सामूहिक समर्पणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

विरोधकांचे निरर्थक आरोप आणि अस्थिर टीका-टिप्पणी याकडे दुर्लक्ष करत कृती हीच खरी प्रतिक्रिया या भूमिकेतून आमदार प्रशांत ठाकूर आपले कार्य अविरतपणे सुरू ठेवतात. ज्या झाडाला फळं लागतात, त्यालाच दगड मारले जातात या उक्तीप्रमाणे त्यांच्यावर होणारी टीका त्यांच्या यशाचंच द्योतक आहे.

आज प्रशांत ठाकूर हे केवळ आमदार नाहीत, तर एक प्रेरणादायी नेतृत्व, कार्यकर्त्यांचा आधार आणि जनतेचा खरा सेवक म्हणून उदयास आले आहेत. ते नेता असूनही कार्यकर्ता राहतात आणि हीच गोष्ट त्यांना लोकांच्या मनात विशेष बनवते.

**-प्रसाद हनुमंते, संयोजक,**
**ओबीसी मोर्चा सोशल मीडिया उत्तर रायगड**

# तळा बाजारपेठ राख्यांनी सजली

**तळा -प्रतिनिधी**

रक्षाबंधन हा पवित्र सण भाऊ बहिणी साठी असणारा पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे.यानिमित्ताने बहिणींची बाजारात राख्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे.



तळा शहरात गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या प्रकारच्या राख्यांची आवक महिलांच्या मागणीनुसार आजपर्यंत वाढतांना दिसत आहे. बाजारपेठेत आकर्षक अशा राख्या दुकानांमधे दिसत असून महिलावर्गाची राख्या खरेदीसाठी मोठी गर्दी होतांना पहावयास मिळत आहे.राख्यांमधे रेश्मीधाग्याच्या,साध्या धाग्याच्या, ज्वेलरी पएॅटन्र्स,जरीकाम, इत्यादी त्याचबरोबर लहान मुलांनसाठी पिंकी मॉस, श्री हनुमान,बाळगणेश,झिगझिग लाईटवाल्या, इत्यादी राख्या उपलब्ध झाल्या आहेत. या राख्यांमध्ये महिलावर्ग साध्या धाग्याची व रेश्मी धाग्यांच्या राख्या खरेदी करतांना पहावयास मिळत आहेत.

अनेक बहिणींचे भाऊ हे नोकरी व्यवसायानिमित्त बाहेर आहेत त्या भावांना बहिणी पोस्टाने राख्या पाठवत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-तळोजा मजकूर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १०३/२ | ०-४८-६०<br>०-०४-३०<br>एकूण ०-५२-९० | ७.६३ | प्रेमनाथ वासुदेव राजे<br>रंजीत वासुदेव राजे<br>विनोद वासुदेव राजे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०५/०८/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई.**
**निविदा सूचना क्र.०९ सन २०२५-२६**

दुरध्वनी क्र. ०२२-२७५७१५३४ e-mail: harbournkb.ee@mahapwd.gov.in

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (३), कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४, सा.बां विभागातील योग्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विफरावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु क्र | कामाचे नावे | अंदाजित किंमत | कंत्राटदारांचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | मौजे देवतलाव उततन ता.ठाणे, जि.ठाणे येथे मासे सुकविण्याचा ओटा बांधणे | रु. २९,३७,६८०/- | मजूर सहकारी संस्था मर्यादित (फक्त ठाणे जिल्हामधील) |
| २ | वाशी हवेली, ता.तळा जि. रायगड येथे मच्छी ओटा व शेड बांधणे. | रु. ४१,०३,४९०/- | खुला वर्ग - ४ आणि वरील |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.०७/०८/२०२५ स. ११.३० ते १८/०८/२०२५ दु.१४.०० पर्यंत
निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.१९/०८/२०२५ दु.१५.०५ वा

टिप ई-निविदेची संपूर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक,

**जा.क्र. पअउ/का-२/निविदा/१४०७/२०२५**
**पत्तन अभियंता वांचे कार्यालय,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),**
**कोंकण भवन, नवी मुंबई-४०० ६१४.**
**दिनांक ४/०८/२०२५**

विमाका/कोवि/२०२५-२०२६/९१

**सही/-**
**(एस एस पवार)**
**पत्तन अभियंता,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ).**
**कोंकण भवन, नवी मुंबई**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## चांगले काम करणाऱ्या प्रत्येकाला भाजपमध्ये संधी -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगले काम करणाऱ्या प्रत्येक माणसाला भारतीय जनता पक्षामध्ये संधी मिळते, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खिडूकपाडा येथे रुग्णवाहिकेच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले. तर आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सांगितले की, सबका साथ सबकाविकास हा मंत्र घेऊन सर्व जनसामान्यांची कामे करूयात नागरीकांच्या समस्या सोडवण्यासाठी दक्ष राहुयात हे काम केल्यास भारतीय जनता पक्षाच्या विजयाचा रथ कोणीही रोखू शकत नाही, असे सांगितले तसेच कामांचा झंझावात जो प्रभूदास भोईर यांच्या माध्यामतून सुरू आहे त्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळत आहे, असे प्रतिपादन केले.



### ◆ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी दक्ष -आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून भारतीय जनता पक्ष खिडूकपाडा तसेच प्रभूदास भोईर आणि सुरेश भोईर यांच्या वतीने रुग्णसेवेसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. तसेच जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय खिडूकपाडा येथे सुरू करण्यात आला आहे. या जनसंपर्क कार्यायालयचे उद्‌घाटन आणि रुग्नवाहिका लोकार्पण सोहळा सोमवारी आयोजीत करण्यात आला होता. या रुग्नवाहिकेचे लोकार्पण आणि जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भारतीय जनता पक्षाचे कमळ हाती घेतले असून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना पक्षप्रवेश करण्यात आला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेशचे सह मुख्य प्रवक्ते अजित चव्हाण, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दि.बा.पाटील यांचे सुपूत्र अतुल पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कळंबोलीश मंडळ अध्यक्ष अमर पाटील, नावडे मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक बबन मुकादम, गणेश कडू, रवींद्र भगत, महाराष्ट्र वाहतुक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, शंकुनाथ भोईर, सुरेश भोईर, जितेंद्र म्हात्रे, सरस्वती काथारा, अतुल घरत, शशिकांत शेळके आदी उपस्थित होते.

## केदार भगत मित्र परिवारातर्फे शिधा वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर भाजपचे उपाध्यक्ष केदार भगत आणि केदार भगत मित्र परिवार यांच्यावतीने लक्ष्मी वसाहतीमध्ये गरीब गरजूंना 'दादांचा शिधा' याचे वाटप करण्यात आले.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उपस्थित राहून दादाच्या शिधाचे वाटप करून सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी सामाजिक उपक्रम राबवण्याची संकल्पना मांडून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आहे. त्यानुसारच पनवेल परिसरात आठवडाभर विविध कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. कोरोना काळात भाजपने नागरिकांना मोफत अन्नदान केले होते.



कार्यक्रमावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, गणेश कडू, शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, सचिव अमित ओझे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे-समेळ, प्रिती जॉर्ज, शहर उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे, पवन सोनी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक आयोजक केदार भगत यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत मंजुळे, राजू कोळी, संतोष ढगे, रोशन जाधव, उमेश मंजुळे, मनीष निपाणीकर, अब्दुल पटेल, विकास मंजुळे, लखन जाधव, संतोष वर्तले, भावेश शिंदे आदींनी प्रयत्न केले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माजी नगरसेविका सुशिला जगदीश घरत व डॉ. अस्मिता जगदीश घरत यांच्यामार्फत नवीन पनवेल सेक्टर १४मधील श्री वरदविनायक घरमालक सोसायटी, सह्याद्री गृहनिर्माण सोसायटी व ओम अपार्टमेंट अशा तीन सोसायट्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तीनही सोसायट्यांमधील आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राजिप शाळा सावळे येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या मार्फत वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव माळी, मारुती माळी, गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गाताडे, माजी सरपंच सुनील माळी, तंटामुक्त कमिटीचे अध्यक्ष रामचंद्र केदारी, युवा उद्योजक राम गाताडे, लक्ष्मण गाताडे, जयवंत म्हात्रे, शांताराम कांबळे, रघुनाथ माळी, नयन भंडारकर, शिक्षक शिंदे आदी उपस्थित होते.**

## रोहिदासवाडा येथे स्वच्छता मोहीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपुलकी फाउंडेशन आणि भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक १९ यांच्या वतीने रोहिदासवाडा येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत रोहिदासवाडा येथील समाज मंदिर आणि बालवाडी परिसर स्वच्छ करण्यात आला.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वच्छता मोहीम हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो समाजाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतो.

स्वच्छता मोहिमेत माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर, नीलिमा शेलार, सिद्दीकी पुंजानी, मंदाताई भगत, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, आपुलकी फाउंडेशनचे अध्यक्ष संजय जाधव, प्रवीण मोहोकर, बाब्या जाधव, रजनीश जाधव, मधुकर उरणकर, निर्मला वैती, शांताराम कल्याणकर, रोहित भगत, गोरख नवले यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक आणि स्वच्छतादूत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाकटा खांदा येथे गुणगौरव आणि छत्री वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने धाकटा खांदा येथील श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि.५) करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून ज्येष्ठ नागिरकांना छत्र्यांचे वाटप केले. या वेळी ते म्हणाले की विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजचे विद्यार्थी हेच उद्याचे भविष्य आहेत. त्याचबरोबर, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे. रत्नदीप स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेला हा कार्यक्रम समाजातील दोन्ही महत्त्वाच्या घटकांना सन्मानित करणारा आहे.





या कार्यक्रमास माजी महापौर कविता चौतमोल, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, एकनाथ गायकवाड, महेंद्र कावळे, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, अलका भगत, अमरीश मोकल, उज्वला पाटील, गणेश म्हात्रे, भाजप नेते भीमराव पोवार, मोतीलाल कोळी, युवा मोर्चाचे अभिषेक भोपी, नितेश घुगे आदी उपस्थित होते.

ज्योत्स्ना भरडा (राज्य उपाध्यक्षा महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघ) यांच्याकडून माननीय आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या वाढदिवसानिमित्त १०० चित्रकला वह्या व २०० गोष्टींची पुस्तके शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता माजी नगरसेवक मनोहर जानू म्हात्रे यांनी केली आणि उपस्थित मान्यवरांना धन्यवाद देऊन आभार मानले. दरम्यान, नेहा वैजयंता सुनील पवार बारावी कॉमर्समध्ये ९४.३३ टक्के गुण मिळाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला.

## खारघरमधील मुर्बी येथे वृक्षारोपण आणि अन्नदान



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गावदेवी मंदिर खारघर सेक्टर १९ मुर्बी येथील या ठिकाणी मंगळवारी सकाळी वृक्षारोपण कार्यक्रम व जीवन ज्योती आश्रम येथे दुपारी अन्नदानाचे आयोजन पनवेल महानगरपालिका माजी नगरसेवक अभिमन्यू धर्मा पाटील व भाजप खारघर शहर युवा मोर्चा अध्यक्ष नितेश अभिमन्यू पाटील यांच्यामार्फत करण्यात आले होते.

या वेळी कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, प्रभाग ४ अध्यक्ष श्री वासुदेव पाटील, खारघर मंडल सरचिटणीस दिपक शिंदे, उत्तर भारतीय मोर्चा उत्तर रायगड संतोष शर्मा, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, अजय माळी, अमित बोधाई, स्नेहल बोधाई, निलम विस्पूते, अनिता जाधव, स्मिता आचार्या, विद्या येवले, रजनी शर्मा श्रीकांत पाटील कैलाश बुवा पाटील, भगवान बडगुजर, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हातगे, प्रथम पाटील, दीपक ठाकूर, ध्रुव गजरा, मंगेश पाटील, सोमनाथ पाटील ,जयेंद्र पाटील,दिनेश कडू, निरंजन पाटील, आदेश पाटील, मुकेश कडू, सागर कोळी, शेखर कोळी, हृतिक पाटील, प्रतीक पाटील, शरद करावकर, बंटी ढाकसे आदी उपस्थित होते.



## तक्का येथील शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तक्का येथील मराठी शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य दृष्टिकोनातून हे शिबिर आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, सुनील बहिरा, अमरीश मोकल, संदीप बहिरा,प्रतिक बहिरा, तुकाराम बहिरा, राम सरग, जितू खुटकर, आफताब ताडे, महेश रावळ, नितेश बहिरा, संतोष अपशिंगे, उमेश अधिक, ब्रिजेश बहिरा, भरत बहिरा, अतुल बहिरा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन अजय तुकाराम बहिरा मित्र मंडळ, प्रभाग क्रमांक आणि तक्का ग्रामस्थ मंडळाने केला होता.


## पोदी येथील प्राथमिक शाळेत कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त साईतेज प्रतिष्ठान आणि आयरिस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २० मधील पोदी येथील प्राथमिक शाळेत मंगळवारी आरोग्य तपासणी शिबिराचे तसेच माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्यावतीने स्कूल बॅगचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या कार्यक्रमाला भेट देऊन पाहणी केली. तसेच उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक तेजस कांडपीळे, अमरशी मोकल, जयराम मुंबईकर, जयेश ठाकूर, समीर मोरे, पराग कार्ले, निता घाटुगडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com